**पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे**

**<u>पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा - २०१९</u>**

**उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना**

- पोलीस शिपाई पदासाठीची लेखी परीक्षा दिनांक १७/१०/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता सुरू होणार आहे. त्यामुळे पोलीस शिपाई या पदावर भरती होण्याकरीता आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर दुपारी ०१.०० ते ०३.०० या वेळेत हजर राहावे. मुख्य प्रवेशद्वार दुपारी ०३.०० वा. नंतर बंद केले जाईल. उमेदवारांना उशिरात उशिरा दुपारी ०३:१० वा. पर्यंतच प्रवेश केंद्रात प्रवेश देण्यांत येईल. त्यानंतर, कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवारांना लेखी परीक्षेची प्रवेश पत्रे संबंधित व्हेंडरन्यासा कम्युनिकेशन्स प्रा. लि. यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.
- आवेदन अर्ज भरते वेळी दिलेला फोटो प्रवेशपत्रावर चिकटवून प्रवेशपत्र ते परीक्षा केंद्रावर घेवून परीक्षेसाठी यावे. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रांवर प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, उमेदवाराने लेखी परीक्षेकरिता काळा, निळा बॉलपेन सोबत घेऊन यावे. परीक्षा केंद्रांवर आलेल्या उमेदवारानी पर्यवेक्षकांच्या समोर प्रवेश पत्रावर स्वाक्षरी करावी.
- शासनाने जारी केलेल्या आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, महाविद्यालयीन कार्ड, ड्रायव्हिंग लायन्सस यापैकी कोणतेही एक मूळ आणि वैध ओळखपत्र उमेदवाराने लेखी परीक्षेकरिता सोबत आणणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने कोव्हिड-१९ च्या आनुषंगाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सॅनिटायझर, मास्कचा वापर करावा व सुरक्षित अंतर ठेवावे.
- उमेदवारांना परीक्षा केंद्रावर त्यांच्या मोबाईलसह इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक वस्तूंसह प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, पायात बुट व पायमोजे घालून व सोबत पाण्याची बाटली घेऊन प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराने परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपल्या सोबत अनावश्यक वस्तू आणू नयेत. आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्याची राहील.
- एखादा उमेदवार लेखी परीक्षेस गैरहजर राहिल्यास त्याला लेखी परीक्षा देण्याबाबत कोणतीही स्वतंत्र संधी किंवा पुढील तारीख देण्यांत येणार नाही. तो आपोआप संपूर्ण भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरेल.
- उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उध्दट वर्तन, गैरवर्तन केल्यास त्यास कोणत्याही क्षणी भरती प्रक्रियेमधून बाद करण्यांत येईल.

- भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारांस कोणतीही शारीरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- लोहमार्ग, पुणे घटकातील पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शक ( Neutral, Impartial & Transparent) पणे होणार आहे.
- उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे/प्रमाणपत्रे बनावट असल्याचे किंवा त्यांनी खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना त्याच टप्प्यावर भरती परीक्षा प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.
- कृपया उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/ दलाल, अधिकारी /कर्मचारी यांच्या भूलथापांना / अमिषाला बळी पडू नये. यामध्ये कोणाचाही वशिला / ओळखीचा उपयोग होणार नाही उमेदवारांची निवड ही संपूर्णपणे गुणवत्तेच्या निकषावरच होणार आहे.
- **पोलीस भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार / गैरकृत्य समजण्यात येईल.**

**१.** अर्जात हेतूपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहित पध्दतीने वितरित न करण्यात आलेले दाखले / कागदपत्रे सादर करणे.

**२.** लेखी परीक्षेसंबंधी या घटकाच्या मालकीचा कोणताही दस्तऐवज उदा. लेखी परीक्षेच्या कालावधीमध्ये प्रश्नपुस्तिका, उत्तरपत्रिका, हजेरीपट, उमेदवारांची ओळखपत्रे फाडणे, फेकून देणे, सोबत घेऊन जाणे किंवा इतर अनधिकृत त्रयस्थ व्यक्तींकडे हस्तांतरित करणे.

**३.** परीक्षेकरिता आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही कर्मचा-यास उदा. समवेक्षक, पर्यवेक्षक, लिपीक, परीक्षा उपकेंद्रप्रमुख, सेवा पुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक इत्यादी यांना त्रस्त करणे, धमकावणे अथवा या शारीरिक इजा करणे अथवा तसा प्रयत्न करणे.

**४.** निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष अथवा परिसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे, इतर उमेदवारांना धमकावणे इत्यादी प्रकारचे गैरवर्तन करणे.

**५.** निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष व कार्यालय आदी ठिकाणी घातक शस्त्र अथवा ज्वलनशील पदार्थासह प्रवेश करणे.

**६.** निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष व कार्यालय इत्यादी निषिध्द केलेल्या ठिकाणी स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली

कोणत्याही प्रकारची साधने, सीमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॅानिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, लेखन पॅड, पाऊच, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य आणणे आणि / अथवा स्वत:जवळ बाळगणे आणि / अथवा त्याचा वापर करणे आणि अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेणे.

**७.** निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष व कार्यालय इत्यादी ठिकाणच्या पायाभूत सुविधा / सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधूस करणे अथवा विद्रुप करण्याचा प्रयत्न करणे.

**८.** स्वत:च्या उमेदवारीच्या अनुषंगाने स्वत: अथवा इतर व्यक्तींकरवी अवैध मार्गाने निवडप्रक्रियेवर प्रभाव टाकणे अथवा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

**९.** निवड प्रक्रियेसंदर्भातील कोणत्याही महत्त्वाच्या कागदपत्रांवर अश्लील अथवा अन्य आक्षेपार्ह लिखाण करणे अथवा चित्रे / आकृत्या रेखाटणे.

**१०.** परीक्षेच्या उत्तरपुस्तिकेतील सूचनांचे उल्लघंन करून उत्तरपुस्तिकेशी छेडछाड करणे अथवा उत्तरपुस्तिकेवर धमकावणारे लिखाण करणे आणि / अथवा स्वत:ची ओळख दर्शविणारी कोणतीही चिन्हे लिहिणे किंवा उत्तरपुस्तिकेत कोणताही अशा आशयाचा मजकूर लिहिणे. जो भरती प्रक्रियेतील उमेदवाराची ओळख दर्शविण्यास मदत करेल.

**११.** तोतयेगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे /अथवा कोणत्याही तोतया व्यक्तीची परीक्षेत मदत घेणे अथवा मदत घेण्याचा प्रयत्न करणे .

१२. अवैध मार्गाने प्रश्नपत्रिका मिळविण्याचा प्रयत्न करणे, प्रश्नपत्रिका फोडणे, प्रश्नपत्रिका फोडणे अथवा फोडण्याचा प्रयत्न करणे, बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परिक्षेत अनधिकृत साहित्याच्या आधारे नक्कल करणे अथवा तत्सम गैरप्रकाराचा प्रयत्न करणे.

१३. एखादया विशिष्ट निर्णयासाठी संघटित अथवा असंघटितपणे कोणत्याही माध्यमातून भरती प्रक्रियेत दबाव आणणे अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न करणे.

१४. अर्जामधीत सर्व दावे/ माहितीची सत्यता तपासण्यासाठी कार्यालयाने मागणी केलेल्या आवश्यक कागदपत्रांचा पुरावा कार्यालयाच्या सूचनेनूसार कोणत्याही टप्प्यावर सादर न करणे.

१५.अर्जामधील दावा/माहिती आणि निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर सादर केलेल्या कागदपत्रांमधील दावा यामध्ये फरक/ तफावत आढळून येणे.

१६. कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना हेतूपुरस्पर वस्तुस्थितीदर्शक माहिती नमूद न करणे, वस्तुस्थिती दडविणे,पुराव्याविना माहिती देणे, पत्रव्यवहारामध्ये खोटे/दिशाभूल करणारे आरोप करणे.

१७. अर्जाव्दारे कार्यालयाकडे केलेला दावा अथवा सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे निवडीच्या अथवा निवडीनंतरच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी,

बनावट, खाडाखोड केलेली, अवैध संबधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम प्राधिका-याने प्रदान केली नसल्याचे आढळून येणे.

१८. भरती अध्यक्ष किंवा भरती परीक्षक इत्यादी यांच्यावर उमेदवाराने अथवा उमेदवाराच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने उमेदवाराच्या निवडीच्या अनुषंगाने दबाव आणण्याचा, प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

१९. स्वत:स अकारण /गैरवाजवी फायदा होण्यासाठी अथवा प्रसिध्दी देण्यापूर्वीची कोणत्याही स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी भरती प्रक्रियेतील कर्मचा-यांवर गैरवाजवी प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

२०. भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि समाज माध्यमांव्दारे भरती प्रक्रियेवर चुकीचे आरोप करणे, की ज्यामध्ये भरती अध्यक्ष किंवा भरती प्रक्रियेतील सदस्य किंवा भरती प्रक्रियेस सहाय्य करणारे तज्ञ किंवा परीक्षक किंवा अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द निदर्शने, घोषणावांजीव्दारे धाकदपटशा दाखवणे यांचा समावेश आहे.

- **गैरप्रकार प्रकरणी कारवाई**

१. लोहमार्ग पुणे घटकाकडून राबविण्यात येणा-या परीक्षेत अथवा परीक्षनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या परंतु गैरप्रकार करण्यास सहाय्यभूत ठरणा-या व्यक्तींवर प्रचलित कायदा व नियमानुसार फौजदारी अभियोग दाखल करुन कारवाई करण्यात येईल.

२. उपरोक्त कृत्यांपैकी प्रकरणपरत्वे एक किंवा अनेक कृत्य करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणे किंवा करण्यास अपप्रेरणा देणे, यांकरिता संबंधित कायादयानुसार फौजदारी अभियोग दाखल करण्यासह पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

अ. संबंधित निवडप्रक्रियेस अनर्ह ठरविणे

ब. या घटकाच्या मार्फतीने आयोजित सर्व परीक्षा अथवा निवडप्रक्रियांकरिता कायमस्वरुपी किंवा ठराविक कालावधीकरिता प्रतिरोधीत करणे

क. गैरप्रकाराच्या अथवा गैरप्रकाराच्या प्रयत्नाच्या आधारे शासकीय नोकरी मिळविलेल्या उमेदवार/व्यक्तींची शिफारस रद्द करणे व त्यानुसार संबंधित विभाग/कार्यालयाकडून सेवा समाप्तीची कार्यवाही.

ड. उमेदवार शासकीय नोकरीत असल्यास, उचित नियमांतर्गत शिस्तभंगविषयक कारवाई.

महाराष्ट्र शासनाकडून पोलीस शिपाई भरती प्रक्रियेबाबत विहित करण्यात आलेल्या सर्व अर्हताविषयक अटी पूर्ण न करणा-या अथवा कोणत्याही प्रकारे गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल किंवा सदर उमेदवार इतर योग्य अशा कारवाईस पात्र असेल.

सदानंद गं. वायसे-पाटील

**(सदानंद गं वायसे -पाटील) भा.पो.से.**

पोलीस अधीक्षक,

लोहमार्ग पुणे